सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, २२ सप्टेंबर २०२३ ⏮ वर्ष पहिले ⏮ अंक १९० ⏮ पाने : ८ ⏮ किंमत रु. ६/- ▌Date : Fri. 22 Sep 2023 ⏮ Volume 01 ⏮ Issue 190 ⏮ Page 8 ⏮ Price : 6/-

## आनंद महिंद्रांकडून कॅनडातील कंपनी बंद करण्याचा निर्णय

नवी दिल्ली : भारत आणि कॅनडामध्ये वाढत असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर उद्योगपती आनंद महिंद्रा यांनी मोठा निर्णय घेतला आहे. दोन्ही देशांमध्ये तणाव वाढत असताना महिंद्रा अँड महिंद्राची उपकंपनी रेसन एरोस्पेस कॉर्पोरेशनने कॅनडातून आपला व्यवसाय बंद करण्याचा निर्णय घेत असल्याची माहिती कंपनीने आज भारतीय शेअर बाजाराला दिली.

महिंद्र अँड महिंद्राची रेसन एरोस्पेस कॉर्पोरेशनमध्ये ११.१८ टक्के भागीदारी आहे. कंपनीने स्वेच्छेनं कंपनीचे कामकाज बंद करण्याची घोषणा केली. रेसनला कॉर्पोरेशन कॅनडाकडून २० सप्टेंबर रोजी सर्टिफिकेट ऑफ डिझॉल्युशन मिळालं आहे, अशी माहिती स्टॉक एक्सचेंजला देण्यात आली आहे. लिक्विडेशन नंतर, कंपनीला अंदाजे २८.७ कोटी रुपये मिळणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. इंडियन अकाउंटिंग स्टॅण्डर्डनुसार २० सप्टेंबर स २०२३ पासून आता कॅनडातील भागिदारीसोबत काही संबंध नसल्याचे महिंद्रा ॲण्ड महिंद्राने स्पष्ट केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून कॅनडा आणि भारत यांच्यातील वाद वाढत चालला आहे. दोन्ही देशांमधील वाढत्या तणावाचा परिणाम आता व्यवसायावर दिसू लागला आहे. आज शेअर बाजारातील व्यवहारावर या घटनेचा परिणाम दिसून आला. बाजारात महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीच्या शेअर्समध्ये मोठी घसरण दिसून आली. आजच्या व्यवहारात महिंद्रा ॲण्ड महिंद्राच्या शेअर दरात ३.११ टक्क्यांची म्हणजे ५०.७५ रुपयांची घसरण दिसून आली. आज बाजारातील व्यवहार स्थिरावले तेव्हा महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचा शेअर १५८३ रुपयांवर स्थिरावला.

# राज्यातील ११ महसूल अधिकारी निलंबत

## बदलीच्या ठिकाणी रुजू न झाल्यामुळे कारवाई

**तभा वृत्तसंस्था,**
**मुंबई, २१ सप्टेंबर :** राज्य सरकारचे बदली आदेश न ऐकणाऱ्या ११ अधिकाऱ्यांना महसूल विभागाने निलंबित केले आहे. यामध्ये ७ तहसीलदार व ४ उपजिल्हाधिकाऱ्यांचा समावेश आहे. महसूल विभागाने एकूण ३० जणांची बदली केली होती. त्यापैकी १९ जण बदलीच्या ठिकाणी रुजू झाले होते तर ११ जणांनी आदेशाचे पालन केले नव्हते. या सर्व अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाईलकरण्यात आलीय.



विदर्भ आणि मराठवाड्यात अनेक जागा रिक्त असायच्या अधिकारी हजर होत नव्हते. पहिल्यांदा आपण या दोन्ही ठिकाणी १०० टक्के जागा भरल्या आहेत.

अनेक अधिकाऱ्यांनी एका जिल्ह्यात अनेक वर्ष मनमानी सेवा केली. जी मक्तेदारी अशा अधिकाऱ्यांनी निर्माण केली होती, ती आपण मोडीत काढत आहोत. अधिकाऱ्यांनी तात्काळ कामावर रुजू व्हावे अन्यथा निलंबनाची कारवाई सुरू होईल, असा इशारा महसूलमंत्र्यांनी दिला होता. त्यानंतर ३० पैकी १९ अधिकारी आपल्या जागेवर रुजू झाले. उर्वरीत बदली केलेले ११ अधिकारी रूजू न झाल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याच आली आहे. मनासारखी पोस्टिंग न मिळाल्याने तब्बल ३० उपजिल्हाधिकारी यांनी दोन महिन्यापासून पोस्टिंग स्वीकारलेली नव्हती. यातील

**निलंबित अधिकाऱ्यांमध्ये यवतमाळ जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी इब्राहिम चौधरी, अहमदनगर जिल्ह्यात बदली झालेले अभयसिंह मोहिते यांचेही निलंबन करण्यात आले आहे. निलंबित झालेल्या चार जिल्हाधिकाऱ्यांपैकी दोन जिल्हाधिकाऱ्यांची नावे अद्याप समोर आलेली नाही. तर विदर्भात वेगवेगळ्या ठिकाणी रुजू न होणाऱ्या ७ तहसीलदारांना निलंबित केले आहे. बी. जे. गोरे (एटपल्ली, गडचिरोली), सुनंदा भोसले (नागपूर), पल्लवी तभाने (वर्धा), बालाजी सूर्यवंशी (अपर तहसीलदार, नागपूर), सरेंद्र दांडेकर (धानोरा, गडचिरोली), विनायक थविल (वडसादेसागंज, गडचिरोली), तर नाशिक विभागातील सुचित्रा पाटील (करमणूक शुल्क अधिकारी, नाशिक) यांचा समावेश आहे.**

बरेचसे अधिकारी मंत्रालय आणि मंत्र्यांच्या दालनामध्ये फेऱ्या मारत होते. त्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आणि आपत्तीग्रस्त नागरिकांना दिलासा देण्यासाठी अनेक ठिकाणी प्रशासन कमी पडताना पाहायला मिळत होते.

बदली झालेल्या ठिकाणी गेल्या दोन महिन्यांपासून अनेक महसूल अधिकारी अद्यापही रुजू झाले नाहीत अशा सर्व अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करत विभागीय आयुक्त पातळीवर चौकशी करण्याचे आदेश राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले होते.

## लॉरेन्स बिश्नोई गँगने केली सुख्खा दुनुकेची हत्या; फेसबुक पोस्ट करत घेतली खूनाची जबाबदारी

**तभा वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, २१ सप्टेंबर :**



पंजाबमधील फरार गुंड सुखदूल सिंग उर्फ सुख्खा दुनुके यांची कॅनडात गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. या हत्येची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई गँगने घेतली आहे. सुख्खा दुनुके याला कॅनडाच्या पिनीपेग सिटीत गोळ्या घालण्यात आल्या होत्या. लॉरेन्स गँगने फेसबुक पोस्टच्या माध्यमातून या खूनाची जबाबदारी स्वीकारली आहे.

लॉरेन्स बिश्नोईच्या एका फेसबुक प्रोफाईलवरुन पोस्ट करत कॅनडातील गँगस्टर सुख्खा दुनुकेच्या हत्येची जबाबदारी स्विकारली आहे. तुम्ही पाहिजे तिकडे पळून जा, तुम्हाला तुमच्या पापांची शिक्षा नक्कीच मिळेल, असे म्हणत लॉरेन्स बिश्नोई फेसबुक पोस्टमधून इतर गँगस्टर्सनाही धमकी दिली आहे. बिश्नोई गँगनं फेसबुक पोस्टमध्ये म्हटले आहे की, होय, सत् श्री अकाल, राम राम. सुख्खा दुनिकाच्या बंबिहा ग्रुपचा प्रभारी असलेल्या व्यक्तीची कॅनडातील विनिपेग शहरात हत्या करण्यात आली आहे. लॉरेन्स बिश्नोई ग्रुप त्याची जबाबदारी घेतोय. केवळ व्यसन भागवण्यासाठी पैसे मिळवण्यासाठी या नशाबाजाने अनेक घरे उद्ध्वस्त केली होती. आमचे भाऊ गुरलाल ब्रार आणि विकी मिद्दुखेडा यांच्या हत्येमध्येही त्याचा हात होता, त्याने देशाबाहेर बसून सूत्रे हलवली. त्याने संदीप नांगल अंबियाचाही खून केला होता, पण आता त्याला त्याच्या पापाची शिक्षा मिळाली आहे. फक्त एक गोष्ट सांगावीशी वाटते की, जे थोडे लोक अजूनही शिल्लक आहेत, ते कुठेही जाऊ देत, जगातल्या कोणत्याही देशात जाऊ शकतात. आमच्याशी शत्रुत्व पत्करुन तुमचा उद्धार होईल, असे समजू नका, कमी-जास्त वेळ लागेल, पण प्रत्येकाला त्यांच्या पापांची शिक्षा होईलच असे बिश्नोई ग्रुपच्या फेसबुक पोस्टमध्ये नमूद करण्यात आलेय.

## भारताने नाकारला कॅनडियन नागरिकांना व्हिसा

**तभा वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, २१ सप्टेंबर :** दहशतवादी हरदीप निज्जरच्या हत्येवरून कॅनडाने भारतावर बेताल आरोप केल्यामुळे दोन्ही देशांचे संबंध कमालीचे ताणले गेले आहेत. यापार्श्वभूमीवर भारताने कॅनेडियन लोकांसाठी व्हिसा सेवा निलंबित केली आहे.

यापूर्वी कॅनडाने मंगळवारी आपल्या नागरिकांना भारताच्या काही भागात न जाण्याचा सल्ला दिला होता. तर बुधवारी भारतानेही असाच सल्ला जारी केला. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने कॅनडामध्ये राहणाऱ्या नागरिकांसाठी एक अ‍ॅडव्हायझरी जारी केली होती. ज्यामध्ये म्हटले होते की, कॅनडात सुरू असलेल्या भारतविरोधी कारवाया पाहता तेथे राहणाऱ्या किंवा प्रवास करणाऱ्या नागरिकांना अत्यंत सावध राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.अलीकडच्या काळात, भारतीय मुत्सद्दी आणि कॅनडामध्ये उपस्थित असलेल्या भारतीय समुदायाच्या विशिष्ट वर्गाला धमकावले जात असल्याचे दिसून आले आहे. भारतविरोधी



अजेंड्याला विरोध करणारे हेच लोक आहेत.

ॲडव्हायझरीनुसार, कॅनडातील बिघडलेली सुरक्षा परिस्थिती पाहता तेथे उपस्थित असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना अत्यंत सावध राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. भारतीय समुदाय आणि विद्यार्थी उच्चायुक्तालय आणि वाणिज्य दूतावासांच्या वेबसाइटवर तक्रारी नोंदवू शकतात. दुसरीकडे, बुधवारी खलिस्तानी दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नू याने कॅनडामध्ये राहणाऱ्या हिंदूंना देश सोडण्याची धमकी दिली होती.

यावर कॅनडाच्या हिंदूंनी जस्टिन ट्रुडो सरकारला पत्र लिहिले आहे. पत्रात पन्नूच्या वक्तव्यावर चिंता व्यक्त करण्यात आली असून याला द्वेषपूर्ण गुन्हा घोषित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कॅनेडियन हिंदू संघटना 'हिंदू फोरम कॅनडा'ने सार्वजनिक सुरक्षा मंत्री डॉमिनिक लेब्लेन यांना हे पत्र लिहिले आहे. हिंदू संघटनेने आपल्या पत्रात म्हटले आहे की, पन्नू यांनी त्यांचे आणि त्यांच्या खलिस्तानी सहकाऱ्यांचे मत स्पष्टपणे व्यक्त केले आहे. त्यांना त्यांच्या विचारधारेशी सहमत नसलेल्या लोकांना लक्ष्य करायचे आहे. कॅनडाच्या सरकारने याचा गांभीर्याने विचार करायला हवा. पन्नूचे हे विधान अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणून घेतले जाणार का, असा सवालही या पत्रात करण्यात आला आहे.

## भारतीय प्रजासत्ताक दिनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आमंत्रित - राजदूत एरिक गार्सेटी

**तभा वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, २१ सप्टेंबर :** पुढील वर्षी २६ जानेवारी रोजी पार पडणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या समारंभासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांना आमंत्रित केले आहे, अशी माहिती अमेरिकेचे भारतातील राजदूत एरिक गार्सेटी यांनी दिली.

एरिक गार्सेटी यांनी सांगितले की, दिल्लीतील जी-२० शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या द्विपक्षीय बैठकीत पंतप्रधान मोदींनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते.

भारत दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी जगभरातील नेत्यांना आमंत्रित करतो. कोविड-१९ साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर २०२१ आणि २०२२ मध्ये प्रजासत्ताक दिनाला प्रमुख पाहुणे उपस्थित नव्हते. पण यंदा अमेरिकेचे



राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांच्यासह इतरही जगभरातील नेते मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

आतापर्यंत आमंत्रित जगभरातील नेते

इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अब्देल फताह अल-सिसी हे यंदाच्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे होते. यापूर्वी २०२० मध्ये ब्राझीलचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जायर बोल्सोनारो, २०१९ मध्ये दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरिल रामाफोसा, तर २०१८ मध्ये सर्व १० आशियन देशांचे नेते समारंभात सहभागी झाले होते. २०१७ मध्ये अबू धाबीचे क्राउन प्रिन्स शेख मोहम्मद बिन जायेद अल नाहयान हे समारंभाचे प्रमुख पाहुणे होते. तर २०१६ मध्ये तत्कालीन फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष ओलांद यांनी भारताच्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याला उपस्थिती लावली होती.

अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी २०१५ मध्ये परेड पाहिली होती. २०१४ मध्ये जपानचे तत्कालीन पंतप्रधान शिंजो आबे समारंभाचे प्रमुख पाहुणे होते. तर भूतानचे राजा जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांनी २०१३ मध्ये परेडमध्ये भाग घेतला होता. प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यात सहभागी झालेल्या इतर राज्य आणि सरकार प्रमुखांमध्ये निकोलस सारकोझी, व्लादिमीर पुतिन, नेल्सन मंडेला यांचा समावेश आहे.

## खुलताबाद उर्स कालावधीत वाहतुक मार्गात बदल

तभा वृत्तसेवा,
**छत्रपती संभाजीनगर, दि. २१ सप्टेंबर–** खुलताबाद शहरात दि.२१ सप्टेंबर ते दि.५ ऑक्टोबर या कालावधीत जर-जरी-जर बक्ष उर्स असून या उर्ससाठी लाखो भाविक खुलताबाद येथे येतात. त्यामुळे खुलताबाद शहरानजिक सोलापुर धुळे रा.म.क्र.५२ वरील रहदारी सुरळीत सुरु राहण्यासाठी दि.२१चे रात्री १२ ते दि.५ ऑक्टोबरचे रात्री १२ वाजेपर्यत यामार्गाने जाणारी सर्व जड अवजड वाहतुकीच्या मार्गात खालीलप्रमाणे बदल करण्यात आला आहे. फुलंब्री-मार्गे खुलताबाद-कन्नड कडे जाणारी सर्व जड वाहने छत्रपती संभाजीनगर, शरणापुर फाटा, माळीवाडा, कसाबखेडा फाटा, नांदगाव मार्गे धुळे कडे जातील. फुलंब्री कडुन उर्सासाठी येणारी सर्व जड वाहणे काटशेवरी फाटा, ममनापुर, भडजी, सराई मार्गे खुलताबाद शहरात येतील. छत्रपती संभाजीनगर मार्गे येणारी सर्व जड वाहतुक ही, शरणापुर फाटा, माळीवाडा, कसाबखेडा फाटा, नांदगाव मार्गे धुळे कडे जातील. छत्रपती संभाजीनगर शहरातुन उर्सासाठी येणारी सर्व हलके वाहने हे छ.संभाजीनगर, दौलताबाद, दौलताबाद घाट मार्गे खुलताबाद शहरात येतील.तसेच या कालावधीत सर्व जड वाहनाची वाहतुक दौलताबाद टी पॉईट पासून दौलताबाद घाट, कागजीपुरा ते वेरुळ पर्यंत बंद ठेवण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया यांनी निर्गमीत केले आहेत.

## शिवसेना आमदार अपात्रता : विधानसभाध्यक्ष पाठवणार आजी-माजी मुख्यमंत्र्यांना नोटीस

**तभा वृत्तसंस्था,**
**मुंबई, २१ सप्टेंबर :** तब्बल वर्षभर प्रलंबित असलेला शिवसेना आमदार अपात्रतेचा तिढा सोडवला जात आहे. यासाठी प्रक्रियेला वेग येत आहे. त्यामुळेच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे शिंदे गटाचे प्रमुख एकनाथ शिंदे आणि ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना येत्या एक-दोन दिवसांत नोटीस पाठवणार आहेत.

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाच्या सुनावणीबाबत निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने आमदारांच्या अपात्रतेच्या प्रकरणावर विधानसभा अध्यक्ष निर्णय घेतील, असे स्पष्ट निर्देश दिले होते. या अनुषंगाने काल (बुधवारी) विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कायदेतज्ज्ञ आणि विधीमंडळाच्या सचिवालयाच्या अधिकाऱ्यांची चर्चा केली. त्यानंतर दोन्ही गटाच्या प्रमुखांना नोटीसा पाठवण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. यामध्ये शिवसेना आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकांवरील सुनावणीसाठी दोन्ही गटांच्या पक्षप्रमुखांनी आपली बाजू एक-दोन आठवड्यात मांडण्याबाबत या नोटीसा असण्याची शक्यता आहे. दरम्यान, आमदार अपात्र याचिकांवरील सुनावणीला विलंब होत असल्याची तक्रार ठाकरे गटाच्या वतीनं करण्यात आली होती. यासंदर्भात ठाकरे गटानं सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली होती.


### E-AUCTION SALE NOTICE
**INVITATION FOR EXPRESSION OF INTEREST (EOI)**
**FOR SALE OF ASSETS OF**
**R. K. CONSTRO PROJECTS PRIVATE LIMITED (IN LIQUIDATION)**

In furtherance of Liquidation Proceedings of R.K. Constro Projects Private Limited (commenced vide Hon'ble NCLT Order dated 25th January, 2021, interalia appointing the undersigned as a Liquidator), the Liquidator, in terms of section35(1)(f) of Insolvency and Bankruptcy Code, 2016 read with Regulation 33 of IBBI (Liquidation Process) Regulations 2016, invites expression of interest (EOI) for sale of assets of the company on "AS IS WHERE IS","AS IS WHAT IS" "WHATEVER THERE IS BASIS" and "NO RECOURSE BASIS".

| Description of Assets | Reserve Price (Rs.) | EMD Amount (Rs.) | Incremental Bid (Rs.) |
|---|---|---|---|
| Bids are invited for sale of Flats & Shop situated at R. K. Constro Fourth Dimension Scheme at Village Hirapur Tq. Dist. Aurangabad; | * 2,55,02,400 | 10% of Reserve Price | 10,000 (where the value of property is less than or equal to 10 Lakhs) 20,000 (where the value of property is more than 10 Lakhs) |
| Bids are invited for sale of Flat and Shop situated at R. K. Constro Pratham Enclave Scheme at Satara Deolai Parisar, Tq. Dist. Aurangabad; | *22,04,900 | 10% of Reserve Price | 10,000 (where the value of property is less than or equal to 10 Lakhs) 20,000 (where the value of property is more than 10 Lakhs) |

* Sale is being conducted for Individual Properties. Reserve Price mentioned is cumulative amount of all properties. For Reserve Price of individual properties refer offer document.

Interested Applicants may submit their EOI for sale of Assets of Company along with prescribed EMD fee as per the terms of the invitation. For eligibility and detailed terms & conditions of the EOI, **email us at rkconstro.liquidation@gmail.com.**

**Other Points:**

1. This Sale Notice shall be read in conjunction with the E-Auction Process Document containing Brief of the Assets, online E-Auction Tender Form, Deed of Indemnity, General Terms & Conditions of E-Auction Sale which are available on Service Provider's **website https://right2vote.in/eauction/** or through mail at **rkconstro.liquidation@gmail.com.**These are to be mandatorily seen before participating in the auction.
2. The EOI documents should be sent to the office of the Liquidator in a sealed plain envelope superscripted as "Expression of Interest for participating in e-auction of **R.K. Constro Projects Private Limited** (under Liquidation), containing a complete set of the EOI in hard copy along with the annexure and proof of EMD at P.No.377, Ambazari Road, Gandhi Nagar, Nagpur-440010 by speed post/ registered post or by hand delivery to be reached on or before 5:00 PM by the **date 10th October, 2023** and additionally, a soft copy of the EOI along with all the annexures and proof of EMD to be mailed at **rkconstro.liquidation@gmail.com & neerajakartikip@gmail.com.**
3. **E- Auction will be start from 3.00 PM to 5.00 PM IST 13th October, 2023** (For assistance, you may contact **Mr. Sandeep Waghmare (Contact details: Mob No. 9850278493).**

**Sd/-**
**IP Neeraja Kartik**
**Liquidator**
**R.K. Constro Projects Private Limited**
**Regn. No. IBBI/IPA-001/IP-P01445/2018-2019/12137**

**Date: 22/09/2023**
**Place: Nagpur**


## मराठवाड्यामधील लघु, मध्यम प्रकल्पांत ३८ टक्के एवढाच उपयुक्तसाठा; ५१ लघु मध्यम प्रकल्प कोरडठाक

**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, दि. २१ सप्टेंबर–**

मराठवाड्यातील ८७७ लघु, मध्यम, आणि मोठ्या प्रकल्पांसह बंधाऱ्यांमधील उपयुक्त पाणीसाठा केवळ ३८ टक्केच शिल्लक आहे. मध्यम आणि लघु प्रकल्पांची अवस्थाही दयनीय असून, ५१ लघु, मध्यम प्रकल्प कोरडेठाक पडले आहेत. जायकवाडी धरणातही अवघा ३४ टक्के एवढाच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असल्याची भीषण स्थिती जलसंपदा विभागाकडून प्राप्त झालेल्या पाणीसाठा अवहालातून समोर आली आहे.

गत तीन वर्षातील प्रकल्पांचा पाणीसाठा नीचांकी पातळीवर असल्याची ही पहिलीच वेळ आहे. छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यात यंदा पावसाने चांगलीच दडी मारली. ओढे, नदी-नाल्यांना पूर येईल असा पाऊस क्वचित प्रसंगी व काही भागातच झाल्यामुळे पाणी ना शेत-शिवारात, ना विहिरींत, ना प्रकल्पात साचले.

### ३१५ प्रकल्प जोत्याखाली

**मराठवाड्यातील २५ मध्यम व २९० लघु प्रकल्पांमधील पाणीसाठा जोत्याखाली गेला आहे. जो त्याखाली पाणीसाठा असलेल्या मध्यम प्रकल्पांत छत्रपती संभाजीनगरमधील ६, जालना व लातूर मधील प्रत्येकी २, बीड व धाराशिवमधील प्रत्येकी ७ तसेच नांदेडमधील एका मध्यम प्रकल्पाचा समावेश आहे. याशिवाय जोत्याखाली पाणीसाठा गेलेल्या लघु प्रकल्पांमध्ये छत्रपती संभाजीनगर मधील २९, जालन्यातील ४८, बीडमधील ६४, लातूरमधील ४३, धाराशिवमधील ९३, नांदेडमधील १, परभणीतील १२ प्रकल्पांचा समावेश आहे. ७४९ पैकी केवळ ११६ लघु प्रकल्पांत ७५ टक्क्यांपेक्षा जास्त पाणीसाठा आहे.**

जलसंपदा विभागाच्या १५ सप्टेंबर अखेरच्या अहवालानुसार मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पांमध्ये सरासरी ४५.३१ टक्के एवढाच उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यातही सर्वात मोठ्या अशा जायकवाडी प्रकल्पात केवळ ३४ टक्के उपयुक्त पाणी आहे निम्न दुधना प्रकल्पात २५ टक्के, बीड मधील मांजरा प्रकल्पात २४ टक्के, तर माजलगाव प्रकल्पात केवळ १२ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. येलदरीत ६१ टक्के, सिद्धेश्वरमध्ये ५८ टक्के, निम्न तेरणा व निम्न मनार प्रकल्पांत प्रत्येकी ५९ टक्के, तर विष्णुपुरी प्रकल्पात सर्वाधिक ९० टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे.

मध्यम प्रकल्पांपैकी छत्रपती संभाजीनगरमधील १६ व बीडमधील १६ प्रकल्पांमध्ये सरासरी १६ टक्के एवढाच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. दुसरीकडे जालन्यातील ७ प्रकल्पांत २१ टक्के, लातूर मधील ८ प्रकल्पांत २० टक्के, धाराशिवमधील १७ प्रकल्पांत १४ टक्के, नांदेडमधील ९ प्रकल्पांत ५३ टक्के, तर परभणीतील २ मध्यम प्रकल्पांत १७ टक्केच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. लघु प्रकल्पांची अवस्था यापेक्षा वेगळी नाही. जालना जिल्ह्यातील ५७ लघु प्रकल्पांत केवळ दोन टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. दुसरीकडे बीड जिल्ह्यातील तब्बल १२६ लघु प्रकल्पांत केवळ ९ टक्के व परभणीतील २२ लघु प्रकल्पांत १० टक्केच उपयुक्त पाणी शिल्लक आहे. धाराशिव मधील २०६ लघु प्रकल्पांत १४ टक्के, लातूरमधील १३४ प्रकल्पांत २४ टक्के उपयुक्त साठा आहे.